2019-20


# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

ISSN 2319-8648 | Impact Factor - 7.139 | Indexed (SJIF)

March 2020 Special Issues- 25 Vol. 3


# The Current Issues in Social Sciences in India (CISSI-2020)


Chief Editor
Mr. Arun B. Godam

Guest Chief Editor
Prof. Dr. B. D. Kokate (I/C Principal)

Dr. S. S. Undare (Vice Principal)
Dr. G. A. Mohite (Vice Principal)

Editor
Dr. R. K. Kale

Co-Editors
Dr. S. N. Akulwar
Dr. B. D. Jadhavar
Dr. S. E. Ghumatkar

Balbhim Arts, Science & Commerce College, Beed

| | | |
|---|---|---|
| 59. | संध्याताई बारगजे यांचे सामाजिक कार्य : एक दृष्टिक्षेप<br>प्रा.डॉ. सांवत के.डी. | 185 |
| 60. | नागरिकत्व दुरुस्ती कायदा, 2019 (CAA)<br>डॉ. सविता भाऊसाहेब नागे | 187 |
| 61. | आधुनिक शासनाची गुरूकिल्ली "ई - प्रशासन"<br>सवाई प्रियंका भास्करराव | 191 |
| 62. | "महिला सक्षमीकरण आणि भारतीय धोरण"<br>डॉ. शामल भिवराव जाधव | 194 |
| 63. | **तृतीयपंथी व्यक्ती : लिंगभेद आणि समस्या**<br>Shankar Dasharath Dunghav | 197 |
| 64. | २० व्या शतकातील महाराष्ट्रातील सामाजिक चळवळीमध्ये स्त्रीयांचे योगदान<br>प्रा.शेजूळ बप्पासाहेब रामलिंग | 200 |
| 65. | "रोकड विरहीत भारतीय अर्थव्यवस्थेचा अभ्यास "<br>प्रा. शेळके सी.एस. | 203 |
| 66. | आधुनिक भारताच्या इतिहासातील नवीन प्रवाह (गडावरील द्वार शिल्पे)<br>शिंदे स्वप्नील संतोष | 207 |
| 67. | सबाल्टर्न ग्रुपचा इतिहास<br>प्रा.शिंदे एच.ए. | 212 |
| 68. | मूलतत्ववाद<br>प्रा.डॉ.शिवाजी गोविंदराव दिवाण | 214 |
| 69. | भारतीय सामाजिक चळवळीतील डॉ.ॲनी बेझंट यांची भुमिका :-<br>प्रा.डॉ.शिवाजी लक्ष्मण नागरगोजे | 217 |
| 70. | **भारतीय राज्यघटनेतील कलम 370 आणि 35 (अ)**<br>**श्री श्रीधर सोनराव आघाव** | 219 |
| 71. | कलम ३७० (३५ अ) समस्या व भारतीय राजकारण<br>सोनवणे सिध्दांत चंद्रकांत | 223 |
| 72. | बदलत्या परिस्थितीत दहशतवादाच्या कारणांचा शोध<br>डॉ. प्रशांत भाऊसाहेब सोळंके | 226 |
| 73. | दहशतवादाचे बदलते स्वरूप<br>आकाष शेषराव बांगर | 228 |

2019-20

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 25, Vol. 3 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

# "रोकड विरहीत भारतीय अर्थव्यवस्थेचा अभ्यास "

**प्रा. शेळके सी.एस.**
सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा, ता.जि. बीड.

**सारांश :-**

भारतासारख्या विकसनशील अर्थव्यवस्थेत भ्रष्टाचार दहशतवादी कारवाया, करचुकवेगिरी, काळ्या पैशाचा साठा व उधळपट्टी इत्यादी सारख्या आर्थिक व्यवहारांशी संबंधित समस्यामुळे शाश्वत आर्थिक विकासामध्ये अडथळा निर्माण होतो. काळ्या पैशातून निर्माण झालेल्या समांतर अर्थव्यवस्थेमुळे आर्थिक विकासावर प्रतिकूल परिणाम होत असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ८ नोव्हेंबर २०१६ रोजी ५०० रु. व १००० रु. च्या चलनी नोटांचे विमुद्रीकरण करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाची अर्थव्यवस्थेच्या सर्वच लहानमोठ्या क्षेत्रांना आर्थिक व्यवहाराची झळ सहन करावी लागली. यातून बाहेर पडण्यासाठी विविध उपायांची अंमलबजावणी सुरु झाली. यातील महत्त्वाचा आणि अनिवार्य निर्णय म्हणजे 'रोकड विरहीत आर्थिक व्यवहार'. विमुद्रीकरणाच्या या निर्णयातून भारतीय जनतेस रोकड विरहीत व्यवहाराकडे वळवणे हा यामागे सरकारचा प्रमुख हेतू असल्याचे दिसून येते.

रोकड विरहीत अर्थव्यवस्थेमध्ये जास्तीत जास्त आर्थिक व्यवहार इलेक्ट्रॉनिक साधने, विविध ॲपद्वारे पार पाडले जातात. रोख चलनी व्यवहाराचे प्राबल्य, पुरेशा बँक शाखांचा अभाव, जलद व नियमित इंटरनेट सेवेचा अभाव, ऑनलाईन साक्षरतेचा अभाव, सायबर सुरक्षा, सर्व लोकसंख्येचा बँक संलग्नित व्यवहाराचा अभाव (Unbanked population) यासारखी आव्हाने रोकड विरहीत अर्थव्यवस्थेसमोर आहेत.

**बीजसंज्ञा :-**

रोकड विरहीत अर्थव्यवस्था, फायदे, आव्हाने इ.

**१) प्रस्तावना :-**

भारतीय अर्थव्यवस्था ही विकसनशील अर्थव्यवस्था असून शाश्वत विकास साध्य करण्यासाठी भारताचे प्रयत्न सुरु आहेत. या प्रक्रियेमध्ये राष्ट्र उभारणीच्या कार्यामध्ये समाजातील विविध घटकांना समान संधी आणि त्यांचा सहभाग महत्त्वाचा आहे. स्वातंत्र्याच्या सात दशकानंतरही भ्रष्टाचार, दहशतवादी कारवाया, बनावटी चलन, करचुकवेगिरी, काळ्या पैशाचा साठा व उधळपट्टी इ. आर्थिक व्यवहारांशी संबंधित समस्या शाश्वत विकासामध्ये अडथळा ठरत आहेत. अशा वेळेस रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या १९३६ च्या कायद्यानुसार सरकारला एका चलनाच्या बदल्यात दुसरे चलन देण्याचा कायदेशीर अधिकार आहे. त्यानुसार ८ नोव्हेंबर २०१६ रोजी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ५०० रु. व १००० रु. च्या चलनी नोटांचे विमुद्रीकरण करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. त्यामुळे लहानमोठ्या सर्व क्षेत्रांना आर्थिक व्यवहाराची झळ सहन करावी लागली. यातून बाहेर पडण्यासाठी निरनिराळ्या उपायांची अंमलबजावणी सुरु झाली. यातील महत्त्वाचा आणि अनिवार्य निर्णय म्हणजे रोकड विरहीत आर्थिक व्यवहार. अर्थव्यवस्थेतील काळा पैसा नष्ट करणे, भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी रोकड विरहीत व्यवहाराला चालना देणे, दहशतवादी कारवाया कमी करण्यासाठी बनावट चलन नष्ट करणे, करचुकवेगिरीला आळा घालणे इ. या निर्णया मागील उद्देश होते. या निर्णयामुळे बनावट नोटांच्या माध्यमातून होणारा विनिमय व्यवहार पूर्णपणे बंद झाला. भारत हा खेड्यांचा देश असून ग्रामीण जनतेमध्ये निरक्षरतेचे प्रमाण जास्त असल्यामुळे डिजिटल आर्थिक साक्षरतेची कमतरता हे देशासमोरील मोठे आव्हान आहे. म्हणून सरकारी, निमसरकारी व्यवस्था ते बँकींग क्षेत्र अशा सर्वच स्तरावर हा बदल घडणे अपेक्षित आहे.

भारतामध्ये विमुद्रीकरणाचा निर्णय प्रथमच झाला असे नाही. १९४६ मध्ये सर्वप्रथम ५०० रु. व १००० रु. च्या चलनी नोटांचे विमुद्रीकरण करण्यात आले होते. तसेच १९७८ मध्ये मोरारजी देसाई पंतप्रधान असताना १००० रु., ५००० रु. व १०००० रु. मूल्यांच्या चलनी नोटांचे विमुद्रीकरण करण्यात आले होते. जागतिक पातळीवरसुद्धा यापूर्वी घाना, नायजेरिया व सोव्हिएत संघ या देशामध्ये विमुद्रीकरणाचा निर्णय घेण्यात आला होता.

२०१६ मध्ये करण्यात आलेल्या विमुद्रीकरणामुळे मात्र सर्वसामान्य जनतेला खुप त्रास सहन करावा लागला. धान्य, भाजीपाला, दुध अशा दैनंदिन वापराच्या वस्तूंची खरेदी व आरोग्य सेवा मिळविण्यासाठी लोकांकडे पैसा राहिला नाही. बँक आणि एटीएम मशीनमध्ये असलेली चलनाची टंचाई यामुळे अनेकांच्या अडचणीत भर पडत होती. कालबाह्य झालेल्या नोटा बँकेतून बदलून घेण्यासाठी लोकांच्या रांगा देशभर दिसून येत होत्या. तसेच दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी बँक आणि एटीएम मधून पैसे घेण्यासाठी लोकांना रांगेमध्ये थांबावे लागत होते. परंतु अशा परिस्थितीतही लोक मनातून आनंदी होते. कारण पंतप्रधानांनी आपल्या भाषणातून म्हटले होते की, सरकारचा हा निर्णय भ्रष्टाचार, करचुकवेगिरी, काळापैसा आणि बनावट नोटांविरुद्धच्या लढाईमध्ये सामान्य लोकांचे हात बळकट करणारा आहे. विमुद्रीकरणातून भारतीय जनतेस रोकडविरहीत व्यवहाराकडे वळवणे हा यामागे सरकारचा हेतू होता.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये भारतीय अर्थव्यवस्थेतील रोकड विरहीत आर्थिक व्यवहाराचे फायदे आणि अर्थव्यवस्थेपुढील आव्हाने यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

**२) संशोधनाची उद्दिष्टे**

१. रोकड विरहीत अर्थव्यवस्थेच्या फायद्यांचा अभ्यास करणे.

२. रोकड विरहीत अर्थव्यवस्थेतील आव्हानांचा अभ्यास करणे.

**३) संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधन लेखाची मांडणी करीत असताना दुय्यम सामुग्रीचा वापर करण्यात आला आहे. संबंधित विषयाच्या अभ्यासासाठी विविध संदर्भ ग्रंथ, शासकीय दस्तावेज, मासिके, संशोधनात्मक लेख, वृत्तपत्रे, संकेतस्थळे इत्यादींच्या माध्यमातून माहिती संकलित करुन विश्लेषण केले आहे.

**४) रोकड विरहीत अर्थव्यवस्था**

"रोकड विरहीत अर्थव्यवस्था म्हणजे अशी अर्थव्यवस्था की, जेथे जास्तीत जास्त आर्थिक व्यवहार डिजिटल साधनाद्वारे पार पाडले जातात. म्हणजेच आर्थिक व्यवहारात रोख रक्कमेचा कमीत कमी वापर केला जातो."

"ज्या अर्थव्यवस्थेत सर्व आर्थिक व्यवहार कमीत कमी रक्कमेत पार पाडले जातात. म्हणजेच देवाण घेवाण, जास्तीत जास्त धनादेश, क्रेडीट व डेबीट कार्डस्, फोन बँकींग, नेट बँकींग, ई-वॉलेट, आरटीजीएस, फोनपे, पेटीएम, नेफ्ट यासारख्या साधनाद्वारे पार पाडले जातात. अशा अर्थव्यवस्थेला रोकड विरहीत (Cashless) अर्थव्यवस्था असे म्हणतात."

थोडक्यात रोकड विरहीत अर्थव्यवस्थेत आर्थिक व्यवहारात कमीत कमी रोख रक्कमेचा वापर करण्याबरोबरच विविध डिजिटल साधनाद्वारे आर्थिक व्यवहार पूर्ण करण्यात येतात.

रोकड विरहीत व्यवहार हा आर्थिक व्यवहार करण्याचा प्रगतीशिल मार्ग आहे. रोकड विरहीत व्यवहार करताना अनेक पर्याय उपलब्ध आहेत. केवळ बँकेत खाते असणे ही यासाठी अनिवार्य बाब आहे. म्हणून पंतप्रधान मोदींनी जनधन खाते उघडण्यासाठी केलेले आवाहन हे रोकड विरहीत व्यवहाराकडे जाण्याची पहिली अवस्था होती. या योजनेअंतर्गत २२ कोटी जनतेची खाती उघडण्यात आली. प्रत्येक नागरीकांचे बँकेत खाते असावे, अर्थव्यवस्थेत त्याचा प्रत्यक्ष सहभाग असावा या दृष्टीने हे पाऊल उचलले गेले. विमुद्रीकरणानंतर रोकड विरहीत व्यवहारांची संख्या वाढविणे आणि भारतीयांना अशा व्यवहारांची सवय लावण्यासाठी सरकारकडून पुरेसे प्रयत्न करण्यात येत आहेत. त्यामुळे अशा व्यवहारात वाढ होताना दिसून येत आहे. २०१६ पूर्वी सुद्धा मॉल्स, सुपरबाजार, ज्वेलर्सशॉप, मेगा स्टोअर्स, कापडांची व इलेक्ट्रॉनिक शोरुम इ. ठिकाणी रोकड विरहीत व्यवहारांची सुविधा होती. तेथील अनेक व्यवहार डेबीट कार्ड, क्रेडीट कार्ड, रुपेकार्ड, व्हिसा कार्ड, एटीएम यासारख्या साधनाद्वारे करण्यात येत होते. परंतु या सर्व सुविधा भारतातील शहरी व निमशहरी भागापुरत्याच मर्यादित होत्या. परंतु ग्रामीण भागात निरक्षरता आणि अज्ञान यामुळे या सुविधांची ओळख आणि उपलब्धतेचा फार मोठा अभाव होता. त्यामुळे तेथील लोकांना रोख रक्कम स्वत:जवळ बाळगणे व रोख रक्कमेतच व्यवहार करणे हे अधिक सोयीचे व सुरक्षेचे वाटत होते. त्यांच्याकडे रोख रक्कम नसेल तर अस्वस्थ आणि असुरक्षिततेची भावना निर्माण होत असे. परंतु अलीकडच्या काळात सर्वत्र तंत्रज्ञानाचा होत असलेला वापर, विमुद्रीकरण आणि रोख व्यवहारावर आलेल्या बंधनामुळे अनेकांची गैरसोय झाल्याने आधुनिक साधनांच्या माध्यमातून रोकड विरहीत व्यवहार करण्याशिवाय पर्याय उरला नाही. शासनाने सुद्धा अशा व्यवहारांची जनतेला सवय लावण्यासाठी प्रचार व प्रसाराची मोहीम हाती घेतली आहे. ज्यामुळे भ्रष्टाचार, नकली नोटा, काळापैसा, दहशतवाद तसेच करचुकवेगिरी यासारख्या अपप्रवृत्तीला आळा घालता येवू शकेल. रोकड विरहीत व्यवहारासाठी रुपे कार्ड, डेबीट कार्ड, क्रेडीट कार्ड, आधार कार्ड, मोबाईल बँकींग, नेटबँकींग, आरटीजीएस, ईसीएस, नेफ्ट, युपीआय, भीम ॲप, फोनपे, गुगलपे, पेटीएम यासारखी विविध साधने उपलब्ध करुन देण्यात आली आहेत.

विमुद्रीकरणानंतर रोख रक्कमेची कमतरता निर्माण झाली. परंतु त्यामुळे या काळात रोकड विरहीत व्यवहारांची संख्या वाढलेली असून त्याचा अर्थव्यवस्थेवर अनुकूल परिणाम दिसून आला. भारत सरकारच्या माहिती व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या अहवालानुसार नोटाबंदीनंतरच्या ९ महिन्यात ११३ कोटी रु. चे रोकड विरहीत व्यवहार घडून आले. म्हणजेच यामध्ये ६० प्रतिशत वाढ घडून आली. आधार कार्ड आधारीत व्यवहारांची संख्या २.५ कोटी रु. पासून ५ कोटी रु. पर्यंत वाढली. तसेच विमुद्रीकरणामुळे ई-कॉमर्समध्ये मोठ्या प्रमाणावर क्रांती घडून आली. ॲमेझॉन व फ्लिपकार्ड या सारख्या वेबसाईटवरुन करोडो रुपयांचे व्यवहार लोक करीत आहेत.

थोडक्यात रोकड विरहीत अर्थव्यवस्थेमध्ये कमीत कमी रोकड वापणारी अर्थव्यवस्था निर्माण करता येते. सर्व आर्थिक व्यवहार तपासता येणार असल्यामुळे पारदर्शकता जोपासता येते. यामुळे देश विघातक आणि दहशतवादी कृत्याकरीता होणाऱ्या अर्थपुरवठ्यावर सरकारला नियंत्रण ठेवता येते. याचबरोबर लोकांची वैध रोकड बँकेत जमा राहते. या रक्कमेचा वापर गरजूंना कर्ज पुरवठा आणि इतर विकास कामासाठी करणे सरकारला शक्य होते. म्हणून अर्थव्यवस्थेतील विविध अपप्रवृत्तींना आळा घालून अर्थव्यवस्थेच्या निकोप वाढीसाठी रोकडविरहीत अर्थव्यवस्थेची आवश्यकता आहे.

**५) रोकड विरहीत अर्थव्यवस्थेचे फायदे**

**i) करचुकवेगिरीला आळा**

रोख व्यवहार पद्धतीमध्ये उत्पन्नाची नोंद ठेवली जात नाही. भ्रष्टाचारासारख्या अवैध मार्गाने कमविलेले उत्पन्न करचुकविण्यासाठी काळ्या पैशाच्या स्वरुपात लपवून ठेवले जाते. परंतु रोकडविरहीत अर्थव्यवस्थेमध्ये सर्व आर्थिक व्यवहारांची डिजिटल नोंद होत असल्यामुळे करचुकवेगिरीवर नियंत्रण ठेवण्यास मदत होते.

**ii) काळ्या पैशाला पायबंद**

भारतीय अर्थव्यवस्थेत स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या २० ते २५ प्रतिशत किंवा किमान ३० लाख कोटी रु. इतका काळा पैसा असून त्यामुळे भारतात समांतर अर्थव्यवस्था निर्माण झाली असा अंदाज आहे. तेव्हा अशा स्थितीत रोकड विरहीत व्यवहारामुळे अशा काळ्या पैशाला पायबंद घालता येईल.

**iii) नकली चलनाला (बनावटी) पायबंद**

बनावटी चलनामुळे दहशतवाद, नक्षलवाद, आतंकवाद यासारख्या देशविघातक कृत्यांना खतपाणी मिळते. परंतु अर्थव्यवस्थेत रोकड विरहीत व्यवहारांचा अंमल सुरु झाल्यामुळे बनावटी नोटांची समस्या संपुष्टात येवून दहशतवाद, आतंकवाद नियंत्रित करण्यास मदत होईल.

**iv) स्थूल राष्ट्रीय उत्पन्नात वाढ**

रोकड विरहीत अर्थव्यवस्थेमध्ये बरेचसे आर्थिक व्यवहार डिजिटल साधनांचा वापर करुन केले जातात. त्यामुळे अशा सर्व व्यवहारांची नोंद होत असल्यामुळे करचुकवेगिरी व त्यातून निर्माण होणाऱ्या काळ्या पैशावर निर्बंध येतात. परिणामी कर महसूलात वाढ होवून स्थूल राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होण्यास मदत होते.

**v) पैसा व वेळेची बचत**

रोकड विरहीत अर्थव्यवस्थेतील आर्थिक व्यवहार कमी वेळेत कुठेही न जाता पार पाडता येतात. त्यामुळे पैशाची व वेळेची बचत होवून ग्राहकांच्या समाधानात वाढ होते.

**vi) रियल इस्टेटच्या किंमती कमी**

रियल इस्टेट क्षेत्रातील व्यवहार रोख रक्कमेच्या स्वरुपात बेकायदेशीरपणे होतात. परंतु रोकड विरहीत अर्थव्यवस्थेमध्ये मात्र असे सर्व आर्थिक व्यवहार डिजिटल साधनांच्या माध्यमातून झाल्यामुळे यामध्ये पारदर्शकता येवून ग्राहकांना कमी किंमतीत रियल इस्टेट खरेदी करण्यास मदत होईल.

**vii) विश्व बँकींग सेवांची उपलब्धता**

रोकड विरहीत व्यवहारामुळे जिल्हा, विभाग, प्रांत, राष्ट्र याबरोबरच आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत ई-कॉमर्सच्या सहाय्याने खरेदी-विक्रीच्या व्यवहारांना चालना मिळते. त्यामुळे उत्पादकांना जागतिक बाजारपेठ उपलब्ध होवून आर्थिक व्यवहारांशी संबंधित सर्व बँकींग सेवा मिळतात.

**viii) सामाजिक कल्याणात वाढ**

रोकड विरहीत व्यवहारामध्ये करचुकवेगिरी करता येत नाही. त्यामुळे सरकारच्या कर महसूलामध्ये वाढ होते. या वाढलेल्या महसूलाचा वापर विकासासाठी आधारभूत संरचना निर्मिती आणि देशातील गरीब व वंचित लोकांच्या कल्याणासाठी केल्यामुळे सामाजिक कल्याणात वाढ होण्यास मदत होते.

**ix) संतूलित विकास**

रोकड विरहीत अर्थव्यवस्थेमध्ये सर्व आर्थिक व्यवहारांची नोंद होत असल्याने सर्व क्षेत्राच्या विकासातील अनुशेषाची कल्पना येते. त्यामुळे मागास क्षेत्राच्या विकासावर भर देवून संतूलित विकास साधता येतो.

**६) रोकड विरहीत अर्थव्यवस्थेपुढील आव्हाने**

भारतात रोकड विरहीत अर्थव्यवस्थेमध्ये प्रामुख्याने ग्रामीण व शहरी अशा दोन स्वरुपाची आव्हाने आहेत.

**अ) रोकड विरहीत ग्रामीण अर्थव्यवस्थेपुढील आव्हाने**

**i) रोख चलनी व्यवहाराचा प्रभाव**

भारताच्या ग्रामीण भागातील आर्थिक व्यवहार मोठ्या प्रमाणात रोखीने करण्यात येतात. काही व्यवहारात तर वस्तूविनिमय पद्धतीचा अवलंब केला जातो. त्यामुळे या ग्रामीण जनतेस रोकड विरहीत व्यवहाराच्या प्रवाहात आणण्याचे मोठे आव्हान आहे.

**ii) पुरेशा बँक शाखांचा अभाव**

शेतीचे नैसर्गिक स्वरुप, पिकांवरील रोगराई, शेतमालाच्या योग्य किंमतीचा अभाव, या सारख्या कारणामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था सातत्याने अडचणीत असते. त्यामुळे बँका ग्रामीण भागात व्यवसायासाठी उत्सुक नसल्याने तेथे रोकड विरहीत व्यवहारांच्या वापरास अपेक्षेप्रमाणे चालना मिळाली नाही. भारताच्या ग्रामीण भागात आजही अनेक खेडे-पाडे, आदिवासी, डोंगरी दुर्गम भागात बँकांच्या शाखांचा अभाव आहे. त्यामुळे अशा भागात बँकांच्या शाखा सुरु करुन तेथील लोकसंख्येला रोकड विरहीत व्यवहाराकडे वळविण्याचे मोठे आव्हान आहे.

**iii) जलद व नियमित इंटरनेट सेवेचा अभाव**

रोकड विरहीत व्यवहारासाठी संगणक, मोबाईल ही महत्त्वाची साधने आहेत. अशा साधनांच्या सहाय्याने आर्थिक व्यवहार करण्यासाठी इंटरनेट सेवा व विद्युत पुरवठा नियमित असणे गरजेचे असते. परंतु ग्रामीण भागात मात्र याचा सातत्याने अभाव जाणवतो. अशा परिस्थितीत रोकड विरहीत व्यवहारात अडथळे निर्माण झाल्याने आर्थिक व्यवहारात सांशकता निर्माण होते. त्यामुळे जलद व नियमित इंटरनेट सेवेबरोबरच विद्युत पुरवठ्यांची सुविधा नियमित पुरविण्याचे आव्हान आहे.

**iv) ऑनलाईन व्यवहारासाठी एटीएम वापराचा अभाव**

रोखीने पैसे काढणे, तसेच ऑनलाईन रोकड विरहीत व्यवहार करण्याचे एटीएम हे एक प्रभावी साधन आहे. परंतु एटीएमचा वापर फक्त रोखीने पैसे काढण्यासाठी केला जातो. भारतात २१ कोटी रुपये कार्डाचा ९२ प्रतिशत वापर केवळ पैसे काढणे आणि रोख व्यवहार करण्याकडे ग्रामीण जनतेचा कल आहे. त्यामुळे अशा ग्रामीण जनतेला एटीएमच्या ऑनलाईन व्यवहाराकडे वळविण्याचे मोठे आव्हान आहे.

**v) ऑनलाईन सुविधाबाबत अनभिज्ञता**

एटीएम, डेबीट कार्ड, क्रेडीट कार्ड, कृषी कार्ड, रुपे कार्ड या साधनाद्वारे होणारे रोकड विरहीत व्यवहार व सेवा याबाबत जनता अनभिज्ञ आहे. निरक्षरता व अज्ञान हे यामागील प्रमुख कारण आहे. याशिवाय रेल्वे, बस, विमान सेवांची टिकीटे, ऑनलाईन शॉपींग, दुकानातील खरेदी ऑनलाईन शॉपींग, मोबाईल रिचार्ज, विद्युत बिले, पैसे पाठविणे, मागविणे, रोख्यांची खरेदी विक्री, ई-पेमेंटस् या सारख्या सुविधाबाबत ग्रामीण जनता अनभिज्ञ असल्याने रोकड विरहीत व्यवहारांनी अपेक्षेप्रमाणे गती प्राप्त होत नाही.

**ब) रोकड विरहीत शहरी अर्थव्यवस्थेपुढील आव्हाने**

शहरी भागामध्ये रोकड विरहीत आर्थिक व्यवहारासाठी अनुकूल वातावरण असले तरीसुद्धा शहरातील झोपडपट्टी, निरक्षरता, कमी उत्पन्न गटातील लोक, विविध क्षेत्रातील कामगार यांना संगणक प्रणालीच्या पुरेशा ज्ञान अभावी व बँक संलग्नित व्यवहाराचा अभाव यामुळे रोकड विरहीत व्यवहारामध्ये अनेक अडचणी निर्माण होत असल्याचे दिसते. अशा बहुसंख्य लोकांना रोकड विरहीत व्यवहाराच्या प्रवाहात आणणे फार मोठे आव्हान आहे.

**७) निष्कर्ष**

भारतासारख्या विशाल भूपद्रेश व लोकसंख्या असणाऱ्या देशात १०० प्रतिशत रोकड विरहीत व्यवहार करणारा समाज निर्माण करणे शक्य नाही. परंतु त्या दिशेने प्रयत्न करता येईल. संघटीत क्षेत्रात अशा व्यवहारास वाव आहे. परंतु ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर, कामगार, बेरोजगार, निरक्षर व अज्ञानी असणाऱ्या ग्रामीण भागातील असंघटीत क्षेत्रास या प्रवाहात आणण्याचे मोठे आव्हान शासन व वित्तीय व्यवस्थेपुढे आहे. शहरी भागामध्ये देखील झोपडपट्टी, निरक्षरता, अल्प उत्पन्न गटातील लोक, विविध क्षेत्रातील कामगार यांना संगणक प्रणालीच्या पुरेशा ज्ञानाअभावी व बँक व्यवहाराच्या अभावामुळे रोकड विरहीत व्यवहाराच्या प्रवाहात आणणे मोठे आवाहन आहे. रोकड विरहीत व्यवहारामुळे लोक रोख पैसा जवळ बाळगणे कमी करतील त्यामुळे समांतर अर्थव्यवस्था नियंत्रित होण्यास मदत होईल. अशा व्यवहारांची ऑनलाईन नोंद होत असल्याने सर्व पैसा हिशोबात येवून करपाया मजबूत होण्यास आणि करदात्याची संख्या वाढण्यास मदत होईल. रोख पैसे जवळ बाळगावे लागणार नसल्यामुळे दरोडे, लुबाडणूक, फसवणूक यासारखे धोके टाळता येतील.

रोकड विरहीत आर्थिक व्यवहारांची पारदर्शक व प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी माहिती तंत्रज्ञानविषयक पायाभूत सुविधा वाढविणे, सायबर सुरक्षा वाढविणे, ऑनलाईन घोटाळे टाळणे, बँक पद्धतीत सर्वसमावेशकता वाढविणे आवश्यक आहे. रोकड विरहीत व्यवहारामध्ये ग्राहकांना आर्थिक शिक्षण देणे आवश्यक आहे. शेतकरी, शेतमजूर, कामगार यांचे आर्थिक व्यवहार रोकड विरहीत व्यवहारांच्या चाकोरीत आणणे गरजेचे आहे. यासाठी शाळा, महाविद्यालये, पंचायती मार्फत कॅशलेस व्यवहाराबद्दल जागृती करणे आवश्यक आहे. विविध कल्याणकारी अनुदान योजनांना बँक खात्यामार्फत जोडणे हा एक धोरणात्मक निर्णय आहे. ग्रामीण भागात आर्थिक शिक्षणाच्या कार्यक्रमातंर्गत आर्थिक कौशल्य, पतव्यवस्थापन यासारख्या विषयावर संवाद साधने गरजेचे आहे. सप्टेंबर २०१८ पासून इंडिया पोस्ट पेमेंट बँक सेवा (IPPB) भारतीय टपाल कार्यालयात केंद्र सरकारने सुरु केली आहे. भारतीय टपाल कार्यालये व टपाल सेवेतील कर्मचारी यांच्या माध्यमातून बँक सेवा विकसित झाली तर आर्थिक समावेशकता प्राप्त होईल. तसेच शेतकरी, शेतमजुर, असंघटीत क्षेत्रातील कामगार, कमी उत्पन्न गटातील लोक या सर्वांना विविध ऑनलाईन साधनांच्या माध्यमातून आर्थिक व्यवहाराच्या चौकटीत आणले तर रोकड विरहीत अर्थव्यवस्थेकडे यशस्वी वाटचाल होईल.

**संदर्भ**

१. V. K. Puri, S.K. Misra - Indian Economy - Himalaya Publishing House, Mumbai-2015.
२. अर्थसंवाद - ऑक्टोंबर/डिसेंबर २०१६.
३. योजना मासिक - फेब्रुवारी २०१७.
४. योजना मासिक - जानेवारी २०१९
५. लोकसत्तामधील विविध लेख
६. http://him.wikipedia.org
७. www.rbi.com
८. www.ibps.com

2019-20



28) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी आणि कार्ल मार्क्स
प्रा.डॉ. पुरुषोत्तम शेषराव जुन्ने, जि. जालना ||109

29) राजर्षी शाहू महाराज आरक्षण विषयक विचार
प्रा. डी. सी. जी. कडेकर, जी. उस्मानाबाद ||113

30) डॉ. भीमराव अम्बेडकर दलितों के मसीहा
प्रा. बालिका रामराव कांबळे, जि.लातूर ||116

31) फुले, शाहू, आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार
श्रीमती रंजना जनार्दन गवळी (कांजुणे), दौलताबाद ||117

32) दलितोद्धार आदोलन में महात्मा फुले जी का योगदान
डॉ.सौ. कठारे मंगला श्रीराम, जि.लातूर ||120

33) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकीय चिंतनाची प्रासंगीकता
प्रा. किर्तीकर वाल्मीक भीमराव, सोलापूर ||122

34) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची राज्य-समाजावादाबाबतचे विचार
प्रा. लावंड पंडित महादेव, बार्शी ||124

35) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार : एक अभ्यास
प्रा. माळगे सविता शंकरराव, जि.उस्मानाबाद ||127

36) महात्मा जोतिबा फुले यांचे स्त्री विषयक विचार आणि कार्ये
प्रा. मनोज ब. देवकर, ता.जि.औरंगाबाद ||130

37) शाहू महाराजांच्या आर्थिक धोरणांची सर्वसमावेशकता
प्रा. शेळके सी. एस., ता.जि. बीड ||132

38) महात्मा फुले : भाषा आणि साहित्य
डॉ. गोवर्धन काशीनाथ मुळक, जि. जालना ||135

39) महात्मा जोतिराव फुले यांचे आर्थिक विचार
डॉ. मुळे पी. एम., जि. बीड ||138

40) राजर्षी शाहु महाराज, म.फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार
पांढरकर श्रीधर मुरलीधरराव, परभणी ||141

www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com

व्हा. तुम्ही आपले मुल बरोबर न्याचे किंवा इथेच ठेवावे त्या मुलाची काळजी ह अनाथाश्रम घेईल'. जोतिबांनी सुरु केलेले बालहत्या प्रतिबंधक गृह हे भारतातील पहीलेच होते. अशा मुलांची सर्व सेवा करण्याचे काम महात्मा फुले व सावित्रीबाईंनी केले. आपल्याला संतती नाही म्हणून दुसरा विवाह न करता बाल हत्या प्रतिबंधक गृहातीलच मुलगा यशवंत याला जोतिबांनी दत्तक घेतले.

या बरोबरच महात्मा फुले यांनी तत्कालीन बहुपत्नीत्वा च्या प्रथेला देखील विरोध केला. पहिली पत्नी जीवंत असतांना दुसरी पत्नी करणे हा निंदनिय प्रकार आहे असे ते मानत होते. ते या संदर्भात म्हणतात, पुरुषांना जास्त बायका करण्याचा अधिकार आहे तर मग स्त्रियांनी एकापेक्षा जास्त नवरे केल्यास चकीचे होणार नाही. ही गोष्ट जर पुरुषांना सहन होणार नसेल तर ती स्त्रियांनी तरी का सहन करावी.

**समारोप :**

महात्मा फुले यांनी तत्कालीन समाजात स्त्रियांच्या प्रश्नांना वाचा फोडली. त्यांच्यावर होणारा अन्याय,त्यांची होणारी कुचंबना थांबवण्यासाठी स्त्रियांसाठी शिक्षणाची दारे खुली केली. मुलींसाठी तत्कालीन सनातनी समाजाचा विरोध सहन करीत शाळा सुरु केली. याचबरोबर बालविवाह, जरठ विवाह,केशवपन, वाघ्या-मुरळी यासारख्या अनेक प्रथा तत्कालीन समाजात होत्या. या विरोधात महात्मा फुले यांनी चळवळ सुरु केली. म्हणून महात्मा जोतिबा फुले यांना स्त्रियांचे कैवारी समजले जाते.

**संदर्भग्रंथ :**

१) अनुराधा गद्रे,महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले (चरित्र)

२) तानाजी ठोंबरे, महात्मा फुले यांचे शैक्षणिक कार्य.

३) महात्मा फुले जीवन आणि कार्य (संपादीत) प्रकाशक, भारतीय विचार साधना प्रकाशन, पुणे.

४) महात्मा ज्योतिबा फुले यांचा सार्वजनिक सत्यधर्म (संपादीत) प्रकाशक श्री. गजानन बुक डेपो.

५) दत्ता जी. कुलकर्णी, महात्मा फुले सामाजिक क्रांतीचे अग्रदूत

❑❑❑

**37**

# शाहू महाराजांच्या आर्थिक धोरणांची सर्वसमावेशकता

**प्रा. शेळके सी. एस.**
सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
कला व विज्ञान महाविद्यालय चौसाळा, ता.जि. बीड

प्रस्तावना :-

शाहू छत्रपतींची कोल्हापूरात राजवट सुरु झाली तेव्हा राज्यकारभारात इंग्रज, पारशी व ब्राम्हण यांचे प्रभूत्त्व होते. त्यामुळे तत्कालीन प्रस्थापिताकडून शाहू महाराजांच्या राजवटीचा मत्सर व द्वेष केला जात होता. बरीच वर्षे स्वत: कोल्हापूरच्या राजाच्या हाती सूत्रे नसल्यामुळे तेथील ब्रिटिश सत्ताधारी जुलमी हुकूमशा बनले होते. ब्रिटिश वरिष्ठ अधिकारी उद्धटपणे वागत होते. तेथील ब्रिटिश सत्ताधारी आणि अधिकारी स्वत:ला छत्रपती शाहू महाराज समकक्ष मानत होते.

राजर्षी शाहू महाराज हे रयतेचे राजे होते. मानवतेच्या मानवतेवर प्रेम करणारा राजा म्हणून शाहू महाराजांची संपूर्ण समाजाला ओळख आहे. शाहू महाराज हे केवळ राजे नव्हते तर सामाजिक क्रांतीचे एक दीपस्तंभ होते. त्यांनी आपल्या विचार व क्रांतीच्या माध्यमातून सामाजिक कार्य केलेले आढळून येते. त्यांना सामाजिक अन्याय आणि विषमतेविरुद्ध चीड होती. समाजातील तळागाळातील माणसाच्या उन्नतीविषयी आस होती. त्यांनी हाती आलेल्या सत्तेचा वापर सामाजिक न्यायाच्या भूमिकेतून केलेला दिसून येतो. अस्पृश्य, मागासलेल्या आणि बहुजन समाजावरील अन्याय दूर करण्यासाठी मानवतावादी दृष्टिकोनातून झटणारा राजा म्हणून शाहू महाराजांचे कार्य उल्लेखनिय आहे.

जनतेची उत्क्रांती, भरभराट आणि प्रगती यांच्या मार्गात तिच्या अनिष्ट सामाजिक चालीरिती व अंधश्रद्धा यांचा अडथळा होता. अनिष्ट रुढी व सामाजिक चालीरितीतील दोष दूर करुन मानवाचा विकास साधण्यासाठी परिस्थिती निर्माण करणे हा त्यांचा उद्देश होता. त्यासाठी लोकांना वास्तवतेची जाणीव करुन देवून त्यांची मने जिंकून धैर्याने विकासाची पावले त्यांना टाकावयाची

होती. त्यासाठी शासनसंस्थेतील कार्यक्षमता वाढविण्याचे त्यांनी ठरविले. संस्थानाच्या सर्वसमावेशक प्रगतीसाठी २ एप्रिल १८९४ रोजी जाहीरनामा काढून तो जनतेला कळविला.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये शाहू महाराजांच्या आर्थिक धोरणाची सर्वसमावेशकता यावर प्रकाश टाकण्यात आलेला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टये :-**

१. शाहू महाराजांच्या आर्थिक धोरणांचा अभ्यास करणे.

२. शाहू महाराजांच्या आर्थिक धोरणातील सर्वसमावेशकतेचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत शोधनिबंध दुय्यम साधनसामग्रीवर आधारीत आहे. संबंधित विषयाच्या अभ्यासासाठी विविध संदर्भग्रंथ, शासकीय प्रकाशने, मासिके, त्रैमासिके, संशोधनात्मक लेख, संकेतस्थळे इ. चा आधार घेवून संकलित माहितीचे विश्लेषण केले आहे.

**शाहू महाराजांच्या आर्थिक धोरणाची सर्वसमावेशकता :-**

या भारतभूमीत स्वातंत्र्यपूर्व कालखंडात अनेक राजे झाले. पण बहुजनांच्या व रयतेच्या उद्धारासाठी आपले जीवन खर्ची घालणारा एकच राजा झाला तो म्हणजे छत्रपती शाहू महाराज. शाहू महाराजांचे सामाजिक कार्य मोठे असले तरी त्यांनी आर्थिक गोष्टीकडे दुर्लक्ष केले नव्हते. करवीर संस्थानाच्या विकासासाठी त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत अनेक आर्थिक धोरणे व सर्वसमावेशक विचार मांडलेले आढळून येतात. त्यांच्या कारकिर्दीत करवीर संस्थानाची अर्थव्यवस्था अविकसित स्वरुपाची होती. जाती पातीच्या प्रभावामुळे समाज दुभंगलेला होता. दारिद्र्य आणि अज्ञानाचा सर्वत्र वावर होता. शिक्षण व सार्वजनिक क्षेत्रावर विशिष्ट जातीची मक्तेदारी होती. सरकारची आर्थिक धोरणे व्यापार वाढीला उत्तेजन देणारी नव्हती. सरकारी पातळीवरील बेशिस्त आणि अनागोंदी कारभाराचा फायदा उचलून नोकरशाही गबर बनली होती. म्हणून महाराजांनी सर्वप्रथम नोकरशाहीवर नियंत्रण मिळवून प्रशासनातील अनागोंदी बंद केली. संस्थानाच्या आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी शेती, उद्योग, दुष्काळ निवारण, गुंतवणूक यावर भर देण्यास सुरुवात केली. सन १८९४ ते १९२२ या त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी शेती, उद्योग, दुष्काळ निवारण आदींसाठी गुंतवणूक करण्यावर भर देण्यास सुरुवात केली. सन १८९४ ते १९२२ या त्यांच्या कारकिर्दीत शेती, उद्योग, दुष्काळ निवारण, आर्थिक गुंतवणूक इ. क्षेत्रातील खर्चाच्या वाढीचे प्रमाण असाधारण असल्याचे आढळून येते. १८९४ ते १९०४ या पहिल्या कालखंडात खर्चाच्या वाढीचे प्रमाण कमी होते. परंतु १९०४ ते १९१६ पर्यंतच्या दुस-या कालखंडात खर्चाच्या वाढीचे प्रमाण जास्त होते तर १९१६ ते १९२२ या कालखंडात खर्चाच्या वाढीचे प्रमाण सर्वाधिक होते. करवीर संस्थानाच्या आर्थिक विकासाला गती देणाऱ्या उपक्रमासाठी मोठ्या प्रमाणावर पैसा खर्च करुन आर्थिक विकासाला गती देण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला दिसून येतो.

संस्थानाच्या अर्थव्यवस्थेला गती देण्यासाठी शाहू महाराजांनी वैयक्तिक व प्रशासकीय खर्चात मोठ्या प्रमाणावर कपात केली. कोणत्याही कामाच्या खर्चाचा समावेश आपली मंजूरी घेतल्याशिवाय करायचा नाही. अशी त्यांनी आज्ञा केली होती. अनुत्पादक खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी कडक आर्थिक शिस्तीचा अवलंब त्यांनी केला होता. त्याचाच एक भाग म्हणून १८९४ मध्ये एकूण खर्चाच्या ६४.४ प्रतिशत खर्च हा अनुत्पादक स्वरुपाचा असल्याचे त्यांच्या लक्षात आल्यामुळे सन १९२२ पर्यंत हा खर्च ४१.७ प्रतिशत पर्यंत नियंत्रणात आणल्याचे दिसून येते. अनुत्पादक खर्चात मोठ्या प्रमाणावर नियंत्रण ठेवण्यात आल्यामुळे उत्पादक खर्चासाठी महाराजांकडे जास्त रक्कम उपलब्ध झाली. या रक्कमेचा वापर शैक्षणिक संस्था, कला कौशल्याला प्रोत्साहन, औद्योगिक आणि व्यापारी संस्थांच्या उभारणी व विकासासाठी खर्च केला. उत्पादक क्षेत्रात प्रशासकीय खर्चाचा वाटा वाढल्यामुळे रोजगाराच्या क्षेत्रात भरीव वाढ होवून बेकारी कमी करण्यास मदत झाली. उत्पादक क्षेत्रातील गुंतवणूकीचा वाटा वाढल्यामुळे १८९४ मध्ये असलेले रोजगाराचे प्रमाण ३.५ प्रतिशत होते. त्यामध्ये वाढ होवून १९१६-१७ मध्ये ६.५ प्रतिशतपर्यंत पोहोचले. सार्वजनिक विकास प्रकल्पावर केलेल्या खर्चामुळे रोजगाराच्या प्रमाणात वाढ होत गेलेली दिसून येते. रोजगारासाठी आवश्यक पायाभूत सुविधा, स्वस्त दराने कर्ज, शेतीचा विकास, उद्योगातून तयार होणा-या वस्तू खरेदीची हमी, बाजारपेठांची स्थापना इत्यादीमुळे रोजगाराच्या क्षेत्रात भरीव वाढ झाली. सार्वजनिक क्षेत्रात मागासलेल्या वर्गासाठी ५० प्रतिशत राखीव जागा ठेवण्याच्या धोरणामुळे सामाजिक गतिमानता आणि सामाजिक न्यायाला हातभार लागला. तसेच सार्वजनिक सेवातील राखीव जागा ठेवण्याच्या धोरणामुळे ब्राम्हण आणि ब्राम्हणोत्तर समाज यांच्या नोकरीतील प्रमाणात बदल झाला. त्यामुळे मागसलेल्या वर्गाला रोजगाराच्या संधी उपलब्ध होवून त्यांच्या आर्थिक प्रगतीस हातभार लागल्याचे दिसून येते. लोकांच्या जीवनमानात सुधारणा व्हावी म्हणून महाराजांनी सार्वजनिक आरोग्याच्या सोयी सुविधा पुरविण्यासाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केल्यामुळे मृत्युदरात घट झाल्याचे आढळून आले.

शेती, उद्योग आणि व्यापार क्षेत्राची विकासातील परस्परपूरकता विचारात घेवून त्यांनी शेती, विपनन, कृषी तंत्रशास्त्र आणि शेतीला लागणाऱ्या पायाभूत सुविधा क्षेत्रात व्यापक बदल केले. शेतीच्या विकासासाठी मुंबई-पुण्यातून शेतीतज्ञ बोलावून त्यांचे मार्गदर्शन शेतकऱ्यांना उपलब्ध करुन दिले. शेती क्षेत्राच्या विकासाचा एक भाग म्हणून पन्हाळा परिसरातील शेतीमध्ये कॉफी लागवडीचा प्रयोग केला. शेतीमालाला बाजारपेठ उपलब्ध करुन देण्यासाठी रस्त्याची अनेक कामे हाती घेण्यात आली. तसेच रेल्वेचा विस्तार करण्यावर भर देण्यात आला. त्यामुळे शेतीमाल बाजारपेठेपर्यंत आणणे सहज सुलभ झाले. शेती क्षेत्राला जलसिंचनाच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी मोठ्या व मध्यम आकाराची धरणे, तलाव बांधणी यामध्ये भरीव गुंतवणूक करण्यात आली. त्यामुळे सिंचन व ऊसाखालील क्षेत्रात वाढ झाली. उदा. राधानगरी धरण, लक्ष्मी तलाव इ. शेतक-यांना शेतीत गुंतवणूक करता यावी म्हणून बिनव्याजी व सवलतीच्या दराने कर्ज वाटप केले. सहकारी संस्था निर्मितीला चालना दिली. त्यामुळे सहकारी चळवळीचा विकास होवू लागला. शेती क्षेत्राच्या विकासासाठी व्यापारपेठांची निर्मिती केली. शाहूपुरी येथे गुळाच्या पेठेचे आधुनिकीकरण शाहू महाराजांच्या शेतीसंदर्भातील सुधारणावादी धोरणाचे उत्तम उदाहरण म्हणून उल्लेख केला जातो. ज्यामुळे शेतीवर प्रक्रिया करणा-या उद्योगांची स्थापना होवू लागली.

शाहू महाराजांनी शेतीसोबत औद्योगिककरणाला प्रोत्साहन देण्याचे धोरण आखले. ब्रिटिशांच्या उद्योगासंबंधीच्या नकारात्मक धोरणामुळे या संस्थानात पुरेशा प्रमाणात उद्योगांचा विकास झाला नव्हता. म्हणून महाराजांनी सर्वप्रथम लहान-लहान लघुउद्योगांना प्रोत्साहन देण्याचे धोरण अवलंबिले. खाजगी आणि सरकारी क्षेत्राच्या संयुक्त भागीदारीच्या माध्यमातून मोठ्या उद्योगांची स्थापना करण्याचा प्रयत्न त्यांनी सुरु केला. उदा. शाहू स्पिनींग ॲण्ड विव्हिंग मिल, लघु आणि मोठ्या उद्योगाबरोबरच सहकारी उद्योगांना मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन दिल्यामुळे अनेक सहकारी उद्योगांची स्थापना त्या काळात झाली. उदा. शाहू विव्हर्स असोसिएशन. संस्थानाच्या विकासातील सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगाचे महत्त्व ओळखून सार्वजनिक क्षेत्रात उद्योग सुरु करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. उदा.१९२० मध्ये स्थापन झालेला वूड डिस्टिलेशन फॅक्टरी. शाहू महाराजांच्या उद्योगासंबंधीच्या व्यापक दृष्टीकोनामुळे खाजगी, सार्वजनिक आणि सहकारी उद्योगांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढलेली दिसून येते. औद्योगिक उत्पादन विक्रीसाठी शाहूपुरी, जयसिंगपूर, गडहिंग्लज येथे प्रमुख बाजारपेठा सुरु करण्यात आल्या. औद्योगिक क्षेत्राला कौशल्यप्राप्त अशा कामगारांचा पुरवठा करण्यासाठी जे.जी. इन्स्टिट्युटमधून तांत्रिक शिक्षण देण्यात येऊ लागले. किल्ल्यातील जुन्या गंजलेल्या तोफा किर्लोस्करांच्या हाती सोपवून शेतीसाठी नांगर बनविण्याचे काम चालू केले. उद्योगांच्या वाढत्या संख्येमुळे उद्योगासाठी लागणारे सुटे भाग तयार करणारा ओतशाळा उद्योगाची भरभराट होवू लागली. इंपिरियल बँक आणि कोल्हापूर अर्बन-को ऑपरेटिव्ह बँक यांच्या स्थापनेमुळे उद्योगाला सहज व सुलभ पद्धतीने कर्जपुरवठ्याची सोय झाली. तसेच उद्योगासाठी आवश्यक रोकड व भांडवलाची तरतूद झाली.

ब्रिटिश राजवटीत अर्थव्यवस्था ढासळण्याचे कारण अनेकदा दुष्काळ मानले जात होते. दुष्काळावर मात करण्यासाठी दुष्काळांच्या कारणांचा शोध घेवून आवश्यक उपाय योजना त्यांनी सुरु केल्या. भविष्यात दुष्काळाच्या झळा लोकांना भोगाव्या लागू नयेत म्हणून पाणीपुरवठा व सिंचनाच्या सोयी करण्यात आल्या. दुष्काळ निवारण्यासाठी अनेक कामे हाती घेण्यात आली. त्या माध्यमातून लोकांना रोजगार उपलब्ध करुन देण्यात आला. दुष्काळाच्या काळात अन्नछत्रे सुरु करण्यात आली. दुष्काळाच्या काळात सार्वजनिक कर्ज व करमाफी सुद्धा देण्यात आली. संस्थानाचे उत्पन्न वाढीसाठी उत्पन्नावर समान कर लागू करण्यात आला. त्यामुळे संस्थानाच्या महसूलात वाढ होण्यास मदत झाली. या महसूलाचा वापर सार्वजनिक खर्चासाठी करण्यात आला. महाराजांच्या बाजारपेठांच्या विकासविषयक धोरणामुळे संस्थानाचे उत्पन्न वाढले. व्यवसाय आणि उद्योगातून महसूल वाढू लागला. रेल्वे, जंगल, अबकारी निर्मिती-उद्योग क्षेत्राचे उत्पन्न १८९४ मध्ये २९.१ प्रतिशत होते तर त्यामध्ये वाढ होवून १९२२ मध्ये ते ३५ प्रतिशत झाले. एकंदरीत राज्याचे उत्पन्न वाढल्यामुळे राज्यावरील कर्जाचा बोजा कमी होवून सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणूकीमुळे राज्याच्या ठेवीमध्ये वाढ झालेली दिसून येते.

**सारांश :-**

महाराष्ट्रातील ब्रिटिशकालीन संस्थानिकांमध्ये कोल्हापूरचे शाहू महाराज यांचे नाव आदराने घेतले जाते. कारण शाहू महाराजांचे कार्य विशिष्ट क्षेत्रापुरते मर्यादीत नाही. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक आदी विविध क्षेत्रात त्यांचे कार्य उल्लेखनिय आहे. समाजसुधारकांना ज्या गोष्टी घडवून आणण्यासाठी अनेक दशके वाट पहावी लागली असती त्या गोष्टी महाराजांनी सहज सोडवून दाखविल्याचे दिसून येते.

शाहू महाराजांचे आर्थिक विचार व धोरण हे

सर्वसमावेशक स्वरुपाचे होते. त्यांच्या आर्थिक विचार व धोरणामुळे शेती, व्यापार, उद्योग, सहकार, आदी सर्व क्षेत्राच्या विकासाला गतिमानता मिळाली. राज्याच्या तिजोरीतील खजिन्याचा वापर त्यांनी चैनीचे व विलासी जीवन जगण्यासाठी केला नाही. अनुत्पादक कामासाठी सरकारी तिजोरीचा वापर केला नाही. सरकारी पैशाचा योग्य पद्धतीने उपयोग केल्यामुळे शाहू महाराजांचे संस्थान अल्पकाळात विकसित संस्थान म्हणून ओळखले जाऊ लागले. शाहू महाराजांनी आखलेल्या आर्थिक धोरणामुळे महाराष्ट्रातील कृषी-औद्योगिक क्रांतीला चालना मिळाली आहे. महाराजांच्या धोरणात सहकारी प्रकल्प आणि संयुक्त भागीदारीच्या प्रकल्पावर असलेला भर यामुळे पुढे पश्चिम महाराष्ट्रात उदयाला आलेल्या सहकारी चळवळीची बीजे होती असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरणार नाही. त्यांचे सर्वसमावेशक कार्य पाहून न.र. फाटक यांनी त्यांच्या कार्याची तुलना इंग्लंडच्या आठव्या हेन्रीच्या कार्याशी केली आहे. यातून त्यांच्या कार्याची थोरवी व महत्ता आपल्या लक्षात येते.

**संदर्भ सूची :-**

१. प्रा. दिनेश मोरे - आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास - के.एस. पब्लिकेशन, पुणे - डिसेंबर २००६.

२. प्राचार्य एस.एस. गाठाळ - महाराष्ट्रातील समाजसुधारक - कैलास पब्लिकेशन, औरंगपूरा, औरंगाबाद- ऑगस्ट २०१६.

३. प्रा.डॉ. महेंद्र पाटील - भारतीय राजकीय विचारवंत - विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद- जून २०१९.

४. धनंजय कीर - राजर्षी शाहू छत्रपती - पॉप्युलर प्रकाशन, मुंबई - २०११.

५. पाटील लीला - समाजशिक्षण राजर्षी शाहू महाराज - ऋचा प्रकाशन, नागपूर.

६. साळूंखे पी.बी. (संपा.) व इतर - राजर्षी शाहू गौरवग्रंथ, मुंबई : महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग-१९७६.

❑❑❑

**38**

# महात्मा फुले : भाषा आणि साहित्य

**डॉ. गोवर्धन काशीनाथ मुळक**
प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख,
मोरेश्वर महाविद्यालय भोकरदन, जि. जालना

***********

महात्मा फुले यांचे वैचारिकतेच्या, साहित्याच्या अंगाने चिंतन केल्यास असे दिसते की, दोन सरळ सरळ विचारधारा ज्यांचे लेखन अविरतपणे चालू आहे. एक विचारधारा वेद, उपनिषदे, ब्राम्हण्यके यांना मानणारी वैदिक पारंपारिक विचारधारा आहे. या विचारधारेत तथाकथित उच्चवर्णीय पिढ्यानपिढ्यांपासून लेखन करीत आहे. हे लेखन मराठी मधील मध्यवर्ती प्रवाहात पांढरपेशी लेखन म्हणून परिचित आहे. दुसरी लेखन परंपरा ही बहुजनवादी लेखन परंपरा असून इतर समाजाचे लेखन यात समाविष्ट झालेले आहे. ही परंपरा उद्रेक, बंड, नकार, दुःख, प्रस्थापितांना विरोध यावर आधारलेली आहे. अलिकडच्या काळात फुले, शाहू आणि आंबेडकरी विचारधारा असे स्पष्टपणे या विचारधारेस म्हटले जाते. महात्मा फुले यांची विचारधारा पुरोगामी होती. प्रस्थापितांच्या अन्यायाला झुगारुन बहुजन शेतमजूर शेतक-यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम महात्मा फुले यांनी आयुष्यभर केले. पुण्यात राहून प्रस्थापितांच्या बालेकिल्यात निधड्या छातीनं वावरणारे फुले हे क्रांतीकारी असे कर्ते समाजसुधारक मानले जातात. ज्यांच्या आयुष्याचं ब्रीद म्हणजे बहुजन, दलित, स्त्रीयांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे. हेच काम त्यांनी आपल्या उभ्या हयातीत अखंडपणे चालू ठेवले. हे करतांना त्यांचा पदोपदी अपमान झाला. छळ झाला. तरी ते डगमगले नाही. त्यांनी आपला दलित बहुजन आणि स्त्रींयांच्या उत्थानाचा लढा चालूच ठेवला.

सावित्रीबाई फुले यांना प्रथम शिक्षण देऊन त्यांनी शिक्षिका केले आणि पुण्यात पहिली मुलींची शाळा काढली. आज हजारो शाळा कॉलेजे निघताहेत. पण त्यांचे हेतूच निराळे, गल्लाभरु आणि बाजारु अशा प्रकारचे दृष्टीकोण डोळ्यांपुढे ठेऊन व्यावसायिक कोर्सेस वर कोर्सेस सुरु होत आहेत. निब्बर संस्थानिक गब्बर होण्यासाठी रगड संस्था काढत आहेत. कंत्रीटी, तात्पुरते,

| Sr. No. | Title of the Papers | Name of Authors | Page No. |
|---|---|---|---|
| 45 | भ्रष्टाचार रोखण्यामधील प्रसारमाध्समांची भूमीका आणि कार्य | रामानंद व्यवहारे | 143 |
| 46 | काळा पैसा व भारतीय अर्थव्यवस्थेव होणारे परीणाम | हांगे ए.एस.<br>चौधरी व्ही.एम. | 147 |
| 47 | काळा पैसा आणि त्याचे भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारे परीणाम | हनूमंत भुमकर<br>कोकाटे जी.एस. | 150 |
| 48 | काळ्या पैशासंदर्भात भारतीय अर्थव्यवस्थेची वास्तवीक परीस्थीती आणि परीणांमाचे विश्लेशन | डी.डी.भोसले | 153 |
| 49 | काळ्या पैशाचे भारतीय अर्थव्यवस्थेवरीले परीणाम | बोडगे एस.जी. | 156 |
| 50 | भारतीय अर्थव्यवस्थेवर काळ्या पैशाचे झालेले परीणाम | मनिषा चौधरी | 158 |
| 51 | काळ्या पैसा व भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारे परीणाम | हांगे ए.एस.<br>चौधरी व्ही.एम. | 160 |
| 52 | काळ्या पैशाचे अर्थव्यवस्थेवरील परीणाम | के.एस.घोडके | 163 |
| 53 | भारतीय अर्थव्यवस्थेवर काळ्या परीणाम | रामदास मुक्टे | 166 |
| 54 | काळ्या पैशामुळे भारतातील समाजावर होणारे परीणाम | राठोड सुभाष | 169 |
| 55 | काळा पैसा आणि भारतीय अर्थव्यवस्था | साबळे एकनाथ | 172 |
| 56 | भारतीय अर्थव्यवस्था: निश्चलनीकरण आणि काळा पैसा | राम ताटे | 175 |
| 57 | भारतीय अर्थव्यवस्थेवर काळ्या पैशाचा परिणाम | सि.एस. वाकोडे<br>सि.एन. कोकाटे | 177 |
| 58 | काळा पैसा : भारतीय अर्थ व्यवस्थेवरील परिणाम | एस.जी.बिराजदार<br>एस.ए.सांगळे | 180 |
| 59 | भ्रष्टाचार : समाजाला लागलेली वाळवी | शिवाजी चौगुले | 1833 |
| 60 | भारतातील काळा पैसा : परिणाम व उपाय | शेळके सी.एस. | 186 |
| 61 | काळा पैसा एक सामाजिक समस्या | खेत्री एच.आर. | 190 |
| 62 | भारतातील काळा पैसा : कारणे, परिणाम व उपाय | डॉ. चव्हाण एम.एच. | 193 |
| 63 | भारतातील काळया पैशावर नियंत्रण : एकज्दृष्टोक्षेप | राम शेवलीकर | 198 |
| 64 | भारताचा काळा पैसा व भ्रष्टाचाराविरुध्दचा लढा | पोटे बी.टी | 200 |
| 65 | काळ्या व्यवहाराचे भारतीय अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रातील परिणाम. | दत्तात्रय नेटके | 204 |
| 66 | भारतीय अर्थव्यवस्था आणि काळा पैसा | देविदास नागरगोजे | 206 |

 ISBN-978-93-84593-96-4

**भारतातील काळा पैसा : परिणाम व उपाय**

**प्रा. शेळके सी.एस.**
कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा, ता.जि. बीड.

प्रस्तावना

प्राचीन काळी भारताला 'गोल्डन बर्ड' या नांवाने ओळखले जात होते. कारण पूर्वी पैसा निर्माण करणारे स्त्रोत आणि त्यांचा वापर हा पारदर्शक होता. देशातील लोक कसलाही स्वार्थीपणा व संकोच न बाळगता उत्साहाने आणि प्रामाणिकपणे प्रत्येकजण देश विकासासाठी काम करत होते. देशाच्या कल्याणावर त्यांचे लक्ष केंद्रित होते. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात परिस्थिती बदलली आहे. देशाची आर्थिक महासत्तेकडे वाटचाल सुरु असताना अनेक समस्यांनी ग्रासले आहे. त्यापैकी एक मुलभूत समस्या म्हणून काळ्या पैशाचा उल्लेख केला जातो. भारतातील भ्रष्टाचार आणि त्यातून निर्माण होणाऱ्या काळ्या पैशामुळे अर्थव्यवस्थेच्या विकासाची स्थिती अत्यंत वाईट झाली आहे. भारतात काळ्या पैशाच्या रुपाने अधिकृत अर्थव्यवस्थेएवढीच समांतर अर्थव्यवस्था कार्यरत असल्याचे दिसून येते. काळ्या पैशाची समस्या ही जगातील विकसित आणि विकसनशिल देशांना सातत्याने भेडसावत आहे. जगातील विविध देशातील श्रीमंत लोक स्वीझ बँकेमध्ये काळा पैसा ठेवताना दिसतात. भारतसुद्धा याला अपवाद नाही. भारतातील राजकारणी, उद्योगपती व इतर व्यक्ती यांच्याकडे असलेला काळा पैसा स्वीझ बँकमध्ये ठेवताना दिसतात. काळा पैसा आणि त्याचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम याचे विश्लेषण करण्यासाठी सविस्तर अभ्यासाची आवश्यकता आहे.

प्रस्तुत शोधनिबंधात भारतातील काळ्या पैशाचे स्वरुप, प्रमाण, त्याचे परिणाम व उपाय यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये

१) काळ्या पैशाचा अर्थ स्पष्ट करणे.
२) भारतीय अर्थव्यवस्थेतील काळ्या पैशाचे स्वरुप व स्थितीचा आढावा घेणे.
३) भारतीय अर्थव्यवस्थेवरील काळ्या पैशाच्या परिणामांचा अभ्यास करणे.
४) काळा पैसा कमी करण्यासाठी उपाय सूचविणे.

संशोधन पद्धती

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम आधार सामग्रीद्वारे आवश्यक ती माहिती व सांख्यिकीय आकडेवारी संकलित केली आहे. ज्यामध्ये विविध संदर्भ ग्रंथ, विषयांशी संबंधित शोधप्रबंध, लघुशोध प्रबंध, संशोधनपर लेख, साप्ताहिके, मासिके, नियतकालिके, संकेतस्थळे इत्यादी सारख्या स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे.

काळा पैसा : अर्थ

१) काळा पैसा म्हणजे असा पैसा जो कर टाळून मिळविला जातो. उत्पन्नाचे असे घटक जे करयुक्त आहेत परंतु कर अधिकाऱ्याकडे त्याची नोंद केली जात नाही.
२) ज्या पैशाची राष्ट्रीय उत्पन्नात नोंद होत नाही, जो पैसा सतत लपविला जातो अशा पैशाला काळा पैसा असे म्हणतात.
३) अवैध मार्गाने केलेल्या संपत्तीच्या साठ्यास काळा पैसा असे म्हणतात.
४) काळा पैसा म्हणजे काळ्या अर्थव्यवस्थेशी निगडीत असलेला पैसा होय.

सर्वसाधारणपणे काळ्या पैशाचा अर्थ गैरमार्गाने कमावलेला पैसा असा घेतला जातो. भ्रष्टाचार, घोटाळे, लूट, चोरी, लाच देणे, जीवनावश्यक वस्तूंची कृत्रिम टंचाई निर्माण करुन अधिकच्या दराने वस्तूंची विक्री करणे, उत्पन्न कमी दाखवून कर चूकविणे यासारख्या बेकायदेशीर मार्गातून कमावलेला पैसा काळा पैसा म्हणून ओळखला जातो. काळ्या पैशाला बिनहिशोबी पैसा या नांवाने देखील संबोधले जाते. म्हणूनच राष्ट्रीय उत्पन्नात काळ्या पैशाची मोजदाद केली जात नाही. म्हणून अशा पैशामुळे समांतर अर्थव्यवस्था निर्माण होते.

भारतातील काळा पैसा

समाजवादी समाजरचना प्रस्थापित करुन देशामध्ये सामाजिक न्यायाची मुहूर्तमेढ रोवण्याचे स्वप्न उराशी बाळगून देशातील दारिद्र्य, बेकारी, अज्ञान, लोकसंख्या विस्फोट यासारख्या आव्हानांचा समर्थपणे सामना करता यावा म्हणून'भारतात नियोजनाचा मार्ग स्विकारला गेला. त्यासाठी सार्वजनिक खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ करण्यावर लक्ष केंद्रीत करण्यात आले. परंतु या सार्वजनिक खर्चात केलेल्या वृद्धीने देशात काळ्या पैशाचे प्रमाण वाढत गेले. देशात प्रशासन व्यवस्था, राजकीय प्रतिनिधी, व्यापारी दलाल, कर चूकवे लोक, डॉक्टर, वकील यासारख्या बुद्धीमान व्यक्तींनी कायद्यातील पळवाटांचा आधार घेवून काळा पैसा निर्माण केला. हे विविध घोटाळ्यावरुन दिसून येत आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात प्रा. निकोलस कॅलडॉर यांच्या १९५६ च्या कर सुधारणा अहवालात देशात दरवर्षी २०० ते ३०० कोटी रु. चा कर बुडविला जात असल्याचा निष्कर्ष काढला. वांच्छू यांच्या प्रत्यक्ष कर समितीच्या निष्कर्षानुसार १९६८-६९ मध्ये १८०० कोटी रु. एवढ्या काळ्या पैशाची निर्मिती झाली. पुनम गुप्ता व संजीव गुप्ता यांच्या अभ्यासानुसार १९७८-७९ मध्ये भारतात ४६८६७ कोटी रु. बेहिशोबी उत्पन्न होते. ओ.पी. चोप्रा यांच्या अभ्यासानुसार १९६०-६१ मध्ये ९१६ कोटी रु. काळा पैसा होता. ज्याचे स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाशी ६.५ प्रतिशत एवढे प्रमाण होते. १९७६-७७ मध्ये यामध्ये वाढ होवून एकूण काळा पैसा ८०९८ कोटी रु. झाला जो स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ११.४ प्रतिशत होता. नॅशनल इन्स्टिस्ट्युट ऑफ पब्लिक फायनान्स ॲण्ड पॉलिसी (NIPFP), नॅशनल कौन्सिल ऑफ अप्लाईड इकॉनॉमिक रिसर्च (NCAER) आणि नॅशनल इस्टिस्ट्युट ऑफ पब्लिक फायनान्शियल मॅनेजमेंट (NIPF) या तीन संशोधन संस्थांनी १९८० ते २०१० या कालावधीत २४६-४८ अब्ज डॉलर (१७,२५,३०० कोटी रु.) ते ४९० अब्ज डॉलर (३४,३०,००० कोटी रु.) एवढा काळा पैसा परदेशात गेल्याची आकडेवारी प्रसिद्ध केली आहे.

भारतामध्ये विविध स्त्रोतांच्या माध्यमांतून काळ्या पैशाची निर्मिती होत आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणावरील भ्रष्टाचाराचा प्रामुख्याने उल्लेख केला जातो. भ्रष्टाचार हेच खऱ्या अर्थाने काळ्या पैशाचे उगमस्त्रोत आहे. International Corruption Perception Index २०१४ मध्ये जगातील १७५ देशातील भ्रष्टाचाराचा अभ्यास करुन काढलेल्या निर्देशांकानुसार भारताचा ८५ वा क्रमांक लागतो तर भूतानचा ३० वा, बांगलादेशाचा १४५ वा, म्यानमारचा १५६ वा, चीनचा १०० वा, नेपाळचा १२६ वा, पाकिस्तानचा १२६ वा आणि श्रीलंकेचा ८५ वा क्रमांक लागतो. यावरुन भारतातील काळ्या पैशाची व्यापकता स्पष्ट होते. स्थावर संपत्तीचे मूल्य कमी दाखविणे, सरकारी खर्चात वाढ करणे, आयात-निर्यातीच्या माध्यमातून अफरातफर करणे, प्रशासकीय कामासाठी वरकड मूल्य घेणे, यासारख्या माध्यमातून काळ्या पैशाचा जन्म होतो. व्यापारी दलाल, प्रशासकीय अधिकारी, राजकारणी यांनी भ्रष्टाचारातून कमावलेला पैसा स्वीझ बँकेमध्ये जमा केला जातो. स्वीझ बँकींग असोसिएशन रिपोर्ट २००६ नुसार स्वीझ बँकेत असणाऱ्या काळया पैशामध्ये सर्वाधिक काळा पैसा १४५६ अब्ज एवढा भारताचा आहे.

२१ मे २०१२ रोजी वित्त मंत्रालयाने लोकसभेत देशातील काळा पैसा संदर्भातील श्वेतपत्रिका जाहीर केली. त्यामध्ये भारतीय लोकांचा स्वीझ बँकेत सर्वाधिक काळा पैसा असल्याचे स्पष्ट केले. एवढेच नव्हे तर श्वेतपत्रिकेनुसार देशातील रियल इस्टेट, फायनान्स, सोनेचांदी, इक्विटी ट्रेडिंग आणि मायनिंग या सारख्या क्षेत्रात काळा पैसा केंद्रीत झाला आहे. कर टाळणे आणि भ्रष्टाचारामुळे ४६२ अब्ज डॉलर एवढी एकूण बेकायदेशीर संपत्ती भारतातून बाहेर गेली असे GFI (Global Financial Integrity) ने त्यांच्या अहवालात सांगितले.

तक्ता क्र. १

| वर्ष | काळ्या पैशाचा अंदाज (करोड रुपये) | GDP च्या टक्के |
|---|---|---|
| १९७५ | ९,९५८ ते ११,७८० | १५ ते १८ |
| १९८० | २०,३६२ ते २३,६८७ | १८ ते २१ |
| १९८३ | ३१,५८४ ते ३६,७८४ | १९ ते २१ |
| २०१२ | □ १०,००,००० | १२ |
| २०१६ | □ १०,००,००० | |

स्त्रोत :- NIPFP Report २०१६

GFI (Global Financial Integrity) च्या विकसनशील देशापासूनचा **बेकायदेशीर वित्तीय प्रवाह** : २००१-२०१० च्या अभ्यासानुसार भारत हा या दशकातील बेकायदेशीर भांडवल प्रवाहात ८ व्या क्रमांकाचा मोठा पिडीत देश आहे. या दशकात तब्बल १५.७ लाख करोड एवढी काळ्या पैशात वाढ झाली असून प्रतिवर्षी सरासरी १.६ लाख करोड बेकादेशीर भांडवल भारतातून बाहेर गेले आहे. सार्वजनिक वित्त आणि धोरण संस्थेच्या २०१० च्या अहवालानुसार भारतात GDP च्या १९ ते २१ प्रतिशत काळा पैसा निर्माण झाल्याचा अंदाज आहे. २०१२ च्या अहवालानुसार भारतातील अंदाजित काळा पैसा हा १० लाख करोड रु. पेक्षा जास्त निर्माण झाला होता. भारतात काळा पैसा निर्मितीस राजकीय इच्छाशक्ती व हितसंबंध कारणीभूत आहेत. ज्यातून २ जी स्पेक्ट्रम घोटाळा, चारा घोटाळा, सिंचन घोटाळा, लष्करातील घोटाळा यासारखे 'आदर्श घोटाळे' राजकीय हितसंबंधामुळे होत आहेत. ज्याचा प्रत्यक्ष प्रभाव नियोजन प्रक्रियेवर होवून आर्थिक विकासावर प्रतिकूल परिणाम होतो.

काळ्या पैशाचे परिणाम

**१. सामाजिक विषमतेत वाढ**

देशातील काळ्या पैशाच्या वाढीमुळे उत्पन्न आणि संपत्तीच्या वाटपात विषमता निर्माण होत आहे. त्यामुळे आर्थिक विकासावर विपरीत परिणाम घडून येतो.

**२. भाववाढ**

 ISBN-978-93-84593-96-4

काळ्या पैशामुळे क्रयशक्ती वाढून वस्तूची मागणी वाढते, मात्र काळा पैसा उत्पादन प्रक्रियेत गुंतविला जात नसल्यामुळे कमी वस्तूचा पाठलाग अधिकचे चलन करते व त्यामुळे भाववाढ होवून विकास प्रक्रियेत अडथळे निर्माण होतात.

**३. सरकारी महसूलीत घट**

वाढता भ्रष्टाचार व त्यातून निर्माण होणाऱ्या काळ्या पैशामुळे उद्योगपती, राजकीय व्यक्ती, व्यापारी मोठ्या प्रमाणावर कर बुडवितात. त्यामुळे शासनाच्या महसूलात घट होवून विकास प्रक्रियेला खीळ बसते.

**४. राष्ट्रीय साधन सामग्रीचा गैरवापर**

देशातील काळा पैसा वैध व्यवसायात गुंतविला जात नाही. जमीन, इमारत, सोने-चांदी अशा खरेदीसाठी हा पैसा वापरला जातो. अशा खरेदीवर कर लागत नाही. त्यामुळे करयोग्य उत्पन्नात घट होवून राष्ट्रीय साधनसामग्रीचा गैरवापर होतो.

**५. सार्वजनिक कर्जात वाढ**

देशातील पैसा विदेशातील बँकामध्ये पडून राहिल्याने विकासात्मक शासकीय योजना राबविताना विदेशी कर्ज घेवून व्याज आणि कर्जाचे ओझे सर्वसामान्य माणसाला पेलावे लागते. त्यामुळे विकासावर निर्बंध येतात.

**६. नैतिक मूल्याचा ऱ्हास**

काळ्या पैशामुळे नैतिक मूल्यांचा ऱ्हास होवून सामाजिक नैतिक संकल्पना कमकुवत होत आहेत. समाजात आपूलकी, नैतिकता, आत्मीयता, सामाजिक नाते इत्यादींचे अस्तित्त्व संपूष्टात येत असून त्याचा विकासावर प्रतिकूल परिणाम घडून येतो.

**७. वाढती बेरोजगारी व गुंन्हेगारी**

भ्रष्टाचारातून निर्माण झालेल्या काळ्या पैशामुळे देशातील बचत, गुंतवणूकीवर मर्यादा येवून अपेक्षेप्रमाणे रोजगार निर्मिती होत नाही. अशा परिस्थितीत बेरोज़गार तरुण स्वतःचा व कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी तस्करी, आतंकवाद, चोरी, दरोडे यासारख्या गंभीर कारवायात सहभागी होतात. त्यामुळे देशातील युवकांचा विकास प्रक्रियेमध्ये मोठ्या प्रमाणावर सहभाग दिसून येत नाही.

**८. आंतरराष्ट्रीय पातळीवर देशाची पत खालावते**

भारतातील वाढता भ्रष्टाचार आणि काळा पैसा यामुळे विदेशी गुंतवणूकदार भारतात व्यवसाय करण्यास उत्सुक होत नाहीत. त्यामुळे जागतिक पातळीवर देशाची प्रतिष्ठा कमी होते व विकास प्रक्रियेवर निर्बंध येतात.

**९. समांतर अर्थव्यवस्थेची निर्मिती**

स्वातंत्र्योत्तर काळात राष्ट्रीय उत्पन्न व सरकारी खर्च वाढीबरोबर देशातील काळ्या पैशाच्या प्रमाणात वाढ होत गेली. भ्रष्टाचारी, नोकरवर्ग, करबुडवे, काळ्या बाजारवाले यांच्या काळ्या पैशाच्या वाढत्या प्रभूत्त्वामुळे देशात समांतर अर्थव्यवस्था निर्माण झाली. त्यामुळे अर्थव्यवस्थेच्या जलद विकासावर त्याचा विपरीत परिणाम होताना दिसून येतो.

**१०. सट्टेबाजीच्या व्यवहारात वाढ**

अतिरिक्त नफा कमावण्यासाठी व्यापारी वर्ग बाजारात वस्तूंची कृत्रिम टंचाई निर्माण करतात. काळ्या बाजारात वस्तूंचा पुरवठा वाढवून काळा पैसा मिळवितात. त्यामुळे मालमत्तेच्या व्यवहारात सट्टेबाजी वाढत जाते. काळ्या पैशाचा वापर कमी किंमतीत मालमत्ता खरेदी व जास्त किंमतीला विक्री करुन अवैध नफा मिळविला जातो. त्यामुळे विकास प्रक्रियेवर विपरीत परिणाम घडून येतात.

**११. आर्थिक नियोजन आखणीत अडचणी**

अर्थव्यवस्थेतील काळ्या पैशामुळे उत्पादन, उपभोग, बचत, गुंतवणूक याबाबतची खरी सांख्यिकीय माहिती उपलब्ध होत नाही. या सांख्यिकीय माहितीच्या अभावामुळे नियोजनकर्त्यांना धोरण आखणी आणि अंमलबजावणी याबाबतीत ठोस उपाय योजना करता येत नाहीत. त्यामुळे अर्थव्यवस्थेच्या विकास प्रक्रियेमध्ये अडथळा निर्माण होतो.

**उपाययोजना**

१) भ्रष्टाचारातून काळ्या पैशाची निर्मिती होते. हा भ्रष्टाचार रोखण्यासाठी कायद्यात कडक नियमांची अंमलबजावणी करण्याची गरज आहे.

२) विदेशी कंपन्यांच्या भारतातील प्रत्यक्ष गुंतवणूकीवर नियंत्रण असावे.

३) सरकारने काळा पैसा जाहीर करण्यासाठी विविध योजनांची अंमलबजावणी करावी.

४) विविध राजकीय पक्षांची निवडणूकात बेसूमार पैशाची उधळण होते त्यासाठी निवडणूक कायद्यात बदल करुन सुधारणा कराव्यात.

५) कर बुडविणाऱ्या लोकांवर फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करावा.

६) भारत सरकारने काळ्या पैशाचे प्रमाण कमी करण्यासाठी कर सुधारणा करुन जनतेवर कमीत कमी कर व कर सवलती देवून कर चुकवेगिरीला पायबंद घालावा.

७) काळा पैसा निर्माण करणारे विविध मार्ग नष्ट करावेत.

८) ग्राहकामध्ये वस्तूंची खरेदी करतांना करभरणा केलेली पावती घेण्याविषयीची जागृती करावी. जेणेकरुन कराची रक्कम सरकारकडे जमा होवून कर महसूलात वाढ होण्यास मदत होईल.

९) शासकीय, निमशासकीय कर्मचारी, व्यावसायिक करदाते, राजकीय व्यक्ती यांच्यामध्ये प्रामाणिकपणे कर भरण्याविषयीची जाणीव जागृती करावी.

१०) विशिष्ट किंमतीच्या चलनी नोटा रद्द करणे.

**निष्कर्ष**

काळा पैसा हा भारताच्या विकासातील सर्वात मोठा प्रमुख अडथळा आहे. भ्रष्टाचारातून निर्माण झालेल्या काळ्या पैशामुळे देशात मोठ्या प्रमाणावर आर्थिक विषमता निर्माण झाली आहे. त्यामुळे अर्थव्यवस्थेच्या विकासावर त्याचा प्रतिकूल परिणाम होत आहे. देशातील भ्रष्टाचाराचे उच्चाटन, काळ्या पैशाचा देशहितासाठी वापर, उत्पन्न व संपत्तीचे समान वितरण इ. बाबींची देशात प्रभावी अंमलबजावणी केली तर देशातील जनतेचे जीवनमाने सुधारुन देशाच्या जलद विकासाला हातभार लागण्यास मदत होईल.

संदर्भ सूची

१. V.K. Puri, S.K. Misra - Indian Economy - Himalaya Publication House, New Delhi-२०१५.
२. Rudra Datta & Sundaram - Indian Economy - S. Chand Publication, New Delhi-२०१६.
३. डॉ. मेघा कानेटकर - भारतीय अर्थशास्त्र - श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर-२०१२
४. प्रा. एन.एल. चव्हाण - भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास भाग २ - प्रशांत पब्लिकेशन्स, पुणे-२००४.
५. भारतीय अर्थव्यवस्था - प्रतियोगिता दर्पण - २०१२.
६. Black Money : White Paper May -२०१२, Ministry of Finance, New Delhi.
७. लोकमत, देशोन्नती, मासिके- २००९, २०१०, २०११, २०१२.
८. दैनिक लोकसत्ता - दि. ३० डिसेंबर २०१६
९. Indian Black Money Wikipedia
१०. www.indianblackmoney.com